महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत**
एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॅन्शन इमारत,तळमजला,लेबर कॅम्प,
धारावी रोड, माटुंगा (पुर्व) मुंबई -४०० ०१९
दुरध्वनी क्र. ०२२-६९४२५००
ई-मेल -agmhrrc@mahagenco.in वेबसाईट :- www.mahagenco.in

---

क्र:महानिर्मिती/उपमहाव्य.(मासं-सेप्र)/७८४९ दिनांक:०२.०९.२०२५

**विषय:** महानिर्मिती जाहिरात क्रमांक ०३/२०२५ अन्वये सुरक्षा संवर्गातील कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) या पदाची बुलढाणा केंद्रावरील शारीरिक क्षमता चाचणी(Physical Efficiency Test) व मनोविश्लेषण चाचणी (Psychometric Test) पुढे ढकलण्याबाबत.

**संदर्भ:** १) महानिर्मिती जाहिरात क्रमांक ०३/२०२५
२) महानिर्मिती सूचना क्रमांक ५०१४ दिनांक ०५.०६.२०२५
३) महानिर्मिती सूचना क्रमांक ७२०४ दिनांक १२.०८.२०२५

---

उपरोक्त विषयास अनुसरून महानिर्मिती कंपनीमार्फत सरळ सेवा भरती अंतर्गत जाहिरात क्रमांक ०३/२०२५ अन्वये सुरक्षा संवर्गातील कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) यांची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. ऑनलाइन परीक्षेअंती शारीरिक क्षमता चाचणीसाठी (Physical Efficiency Test) तात्पुरते पात्र ठरत असलेल्या उमेदवारांची शारीरिक क्षमता चाचणी (Physical Efficiency Test) बाह्यस्त्रोत भरती संस्थेमार्फत दिनांक ०२ ते ०४ सप्टेंबर २०२५ दरम्यान सातारा आणि बुलढाणा केंद्रांवर आयोजित करण्यात आली होती. सदरील परीक्षेसाठी तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या यादीसह सविस्तर सूचना संदर्भीय क्रमांक ०२ अन्वये प्रसिद्ध करण्यात आली होती.

तथापि, दिनांक ०१.०९.२०२५ रोजीच्या रात्रीपासून बुलढाणा येथे अचानकपणे सुरू झालेल्या अतिवृष्टीमुळे शारीरिक क्षमता चाचणीसाठीचे मैदान पूर्णतः ओले झाले असल्याने आणि अति पाऊसाची शक्यता पाहता, दिनांक ०२ ते ०४ सप्टेंबर २०२५ रोजी बुलढाणा येथे आयोजित शारीरिक क्षमता चाचणी (Physical Efficiency Test) परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. येणाऱ्या काळात पाऊसाची आणि इतर संलग्नित बाबींची शक्यता पाहून सदरील परीक्षेच्या नवीन तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील.

तसेच शारीरिक क्षमता चाचणी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांची मनोविश्लेषण चाचणी (Psychometric Test) दिनांक ०५ सप्टेंबर २०२५ रोजी त्याच केंद्रांवर म्हणजेच सातारा व बुलढाणा येथे पार पडणार होती. परंतु बुलढाणा केंद्रावरील शारीरिक क्षमता चाचणी (Physical Efficiency Test) परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याने,पर्यायाने मनोविश्लेषण चाचणी (Psychometric Test) देखील पुढे ढकलण्यात येत आहे. करिता, सद्यस्थितीत सातारा केंद्रावर सुरू असलेल्या शारीरिक क्षमता चाचणीअंती मनोविश्लेषण चाचणीसाठी (Psychometric Test) पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची परीक्षा दिनांक ०५ सप्टेंबर २०२५ रोजी होणार नाही,याची उमेदवारी नोंद घ्यावी. बुलढाणा केंद्रावरील शारीरिक क्षमता चाचणीच्या (Physical Efficiency Test) दिनांक सोबत मनोविश्लेषण चाचणी (Psychometric Test) परीक्षेचा दिनांक देखील कळविण्यात येईल.

**(डॉ. नितीन वाघ)**
**कार्यकारी संचालक (मासं)**